कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब,
अराजपत्रित पदे भरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
**शासन परिपत्रक क्रमांक- सेप्रनि-१०९७/२३७/आस्थापना-२,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ डिसेंबर, १९९८.

वाचा :- १) **शासन निर्णय,** पाटबंधारे विभाग, क्रमांक-सीव्हीएस-१५८२/१५८/(२१५)/आस्था-२
दिनांक १६ एप्रिल, १९८४.

२) **शासन अधिसूचना,** पाटबंधारे विभाग, क्रमांक-एमएससी-१०८४/(६१)/आ(संनि),
दिनांक- १६ जून, १९९७,

३) **शासन अधिसूचना,** सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-आरटीआर-१०८९/११८३/आ-२,
दिनांक १ जानेवारी, १९९८.

४) **शासन अधिसूचना,** सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमाक-सेप्रनि १०९७/२३७/आस्था-२,
दिनांक ९ नोव्हेंबर, १९९८.

## परिपत्रक

सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागांतर्गत कनिष्ठ अभियंत्यांना राज्यशासनाने राजपत्रित दर्जा देऊन तसे आदेश १६ एप्रिल, १९८४ रोजी निर्गमित केले. त्यानुसार सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंता असे दोन संवर्ग निर्माण करण्यात आले आहेत. एकूण कनिष्ठ अभियंत्यांच्या पदसंख्येच्या २५ % पदांना वर्ग-२ चा दर्जा देऊन त्याचे 'सहाय्यक अभियंता श्रेणी-२' (कनिष्ठ स्तर) असे नामाभिधान करण्यात आले. या पदाचे सेवाप्रवेश नियम शासनाने १६ जून, १९९७ रोजी निर्गमित केले आहेत. त्याचप्रमाणे कनिष्ठ अभियंता या पदाचे सेवाप्रवेश नियम १ जानेवारी, १९९८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सहाय्यक अभियंता श्रेणी-२ हे ब गटातील (वर्ग-२ चे) राजपत्रित पद असल्यामुळे या पदावर एकूण कनिष्ठ अभियंत्यांच्या पदांच्या २५ % नियुक्त्या सरळसेवा भरतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार केल्या जातात.

३. उर्वरित ७५ % पदावर कनिष्ठ अभियंता पदाचे सेवाप्रवेश नियमातील तरतुदी खालील प्रमाणे आहेत :—

अ) ज्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका व तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली पदविका वा अर्हता धारण केली आहे व ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त नाही अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ९० % पदे प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाच्या शिफारशीनुसार भरावयाची आहेत.

ब) ज्यांनी ३ वर्षापेक्षा कमी नाही, इतकी नियमित सेवा पूर्ण केली आहे व ज्यांनी अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांच्याकडून घेण्यात येणारी अर्हता परीक्षा उत्तीर्ण केली आहे, अशा व्यक्तींमधून योग्यता व ज्येष्ठतेच्या अधीन पदोन्नतीने १० % पदे भरावयाची आहेत. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाचे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार एकूण पदाचे ७५ % पदांवर नामनिर्देशनाने व पदोन्नतीने नियुक्ती करावयाच्या सूचना, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १६ एप्रिल, १९९८ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व अधीक्षक अभियंता व समन्वय अधीक्षक अभियंता यांना देण्यात आल्या आहेत.

४. पाटबंधारे व सा. बां. विभागांतर्गत कार्यरत असलेल्या 'स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक', पद धारण करणा-या व्यक्तींनी ज्यांनी अंशकालीन किंवा दूरशिक्षणाद्वारे स्थापत्य अभियांत्रिकी पदविका धारण केली आहे, अशा व्यक्तींमधून कनिष्ठ अभियंत्यांची ५ % पदे पदोन्नतीने भरण्याची दुरूस्ती, कनिष्ठ अभियंत्यांच्या मूळ सेवाप्रवेश नियमात, शासनाने शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक सेप्रनि-१०९७/२३७/आस्थापना-२, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९८ रोजी केली आहे.

५. कनिष्ठ अभियंत्यांच्या मूळ सेवाप्रवेश नियमात शासनाने केलेल्या दिनांक ९ नोव्हेंबर, १९९८ च्या दुरूस्तीनुसार आता कनिष्ठ अभियंत्यांची पदे खालीलप्रमाणे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरावयाची आहेत :-

(१) ज्या व्यक्तींनी शासनाने मान्यता दिलेल्या ३ वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदविका किंवा तिच्याशी समतूल्य म्हणून मान्यता मिळालेली अशा इतर कोणतीही अर्हता धारण केली आहे व ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नाही, अशा व्यक्तींमधून, नामनिर्देशनाने ८५ %;

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पद धारण करणा-या व या पदांवरील ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व ज्यांनी अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांच्याकडून घेण्यात येणारी कनिष्ठ अभियंता या पदाची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण केली आहे अशा व्यक्तींमधून, योग्यता व ज्येष्ठतेच्या तत्वावर पदोन्नतीने १० %; व

(३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पद धारण करणा-या, ज्या व्यक्तींनी अंशकालीन किंवा दूरशिक्षणाद्वारे पदविका धारण केली आहे अशा व्यक्तींमधून, पदोन्नतीने ५ %.

वरील परिच्छेद ५ च्या अनुक्रमांक (१), (२) आणि (३) येथे नमूद केल्याप्रमाणे नामनिर्देशन व पदोन्नतीच्या भरतीचे प्रमाण अनुक्रमे खालीलप्रमाणे राहील :-

१) नामनिर्देशनाने : ८५ %

६. ज्या स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना परिच्छेद ७ (२) येथील आवश्यक ती पात्रता धारण केली आहे अशांची यापुढे सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१ जून, १९८२ च्या नियमावलीतील तरतुदीनुसार विनियमित करण्यात यावी.

७. ज्या स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांनी अंशकालीन किंवा दूरशिक्षणाद्वारे पदविका धारण केली आहे अशांची वर्षनिहाय स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी.

८. शेडयपात्र सहायक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता या पदांच्या नियुक्त्या, अनुक्रमे १६ जून, १९९७ व ८ जानेवारी, १९९८ आणि २ ऑक्टोबर, १९९८ च्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार यापुढे करण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. गं. निकुम्बे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळे,
कार्यासन संवा-३/आस्था-१/आस्था-३, सा. बां. विभाग मंत्रालय, मुंबई,

प्रत कार्यवाहीसाठी अग्रेषित :

पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई (५० प्रतींसह)
निवडनस्ती.